


दैनिक

लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

LOK AARAMBH

dainiklokaarambh@gmail.com

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

प्रतिनिधी नेमणे आहे.

बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा

९४०३६ ४१४८२

राहुल मारोतीराव वाईकर

बीड/महाराष्ट्र वर्ष २ रे | गुरुवार १० ऑक्टोबर २०२४ | अंक ३०५ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

# भारताच्या उद्योग क्षेत्रातला बापमाणूस हरपला, रतन टाटा यांचं निधन, ब्रीच कँडी रुग्णालयात अखेरचा श्वास

रतन टाटा एक माणूस म्हणून श्रेष्ठ व्यक्तीमत्व होते. त्यांनी आपल्या कंपन्यांमध्ये काम करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचा विचार केला. ते आपल्या कंपन्यांमधील कनिष्ठ पातळीवरील कर्मचाऱ्यांच्या थेट संपर्कात जाण्याचा प्रयत्न करायचे. त्यांनी अनेकदा कर्मचाऱ्यांशी तसा संवादही साधला. ते कर्मचाऱ्यांच्या हितासाठी प्रचंड काम करायचे. त्यांच्या प्रेमामुळे कर्मचारीदेखील टाटा यांच्यावर तितकाच प्रेम करायचा. टाटा यांनी केलेल्या विविध सामाजिक कार्य आणि उद्योग क्षेत्रातील कार्यामुळे त्यांना अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आलं होतं.

रतन टाटा यांना 2000 मध्ये पद्मभूषण पुरस्काराने गौरविण्यात आलं होतं. त्यानंतर त्यांना 2006 मध्ये महाराष्ट्र सरकारच्या सर्वोष्ठ मानल्या जाणाऱ्या महाराष्ट्र भूषण पुरस्काराने गौरविण्यात आलं होतं. त्यानंतर रतन टाटा यांना केंद्र सरकारकडून 2008 मध्ये पद्मविभूषण पुरस्काराने गौरविण्यात आलं होतं. टाटा यांना 2014 मध्ये ऑनररी नाइट ग्रँड क्रॉस ऑफ द ऑर्डर ऑफ द ब्रिटिश एम्पायरने गौरविण्यात आलं होतं. त्यांना 2021 मध्ये आसाम वैभव पुरस्काराने गौरवण्यात आलं होतं. रतन टाटा यांना 2023 मध्ये ऑर्डर ऑफ ऑस्ट्रेलिया या पुरस्कराने देखील सन्मानित करण्यात आलं होतं. अशा अनेक पुरस्कारांनी रतन टाटा यांना देशात आणि विदेशात सन्मानित करण्यात आलं होतं.



भारताच्या उद्योग क्षेत्रातील बापमाणूस, प्रसिद्ध उद्योगपती रतन टाटा यांचं निधन झालं आहे. रतन टाटा यांना रविवारी (6 ऑक्टोबर) रात्री उशिरा साडेबारा ते एक वाजेच्या दरम्यान रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. रतन टाटा यांना रक्तदाबाचा त्रास जाणवू लागल्याने ब्रीच कँडी रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. रतन टाटा यांना रुग्णालयात दाखल करण्यात आल्यानंतर टाटा यांनी सोमवारी (7 ऑक्टोबर) दुपारी साडेबारा वाजेच्या सुमारास स्वत: ट्विट करत आपल्या प्रकृतीची मीहिती दिली होती. "माझ्या प्रकृतीविषयी अफवा पसरली आहे. पण माझे वय लक्षात घेता आणि सध्याची माझी प्रकृती पाहता माझ्या काही वैद्यकीय तपासण्या केल्या जात आहेत. त्यामुळे काळजी करण्यासारखं कोणतेही कारण नाही", असं रतन टाटा म्हणाले होते. टाटा यांना दाखल केल्याची बातमी समोर आल्यानंतर तिसऱ्या दिवशी संध्याकाळी त्यांची प्रकृती जास्त खालावल्याची माहिती समोर आली. प्रकृती खालावल्यामुळे रतन टाटा यांना ब्रीच कँडी रुग्णालयात आयसीयूत दाखल करण्यात आल्याची माहिती समोर आली होती. रतन टाटा यांचा जन्म 28 डिसेंबर 1937 रोजी झाला होता. त्यांचं नाव भारताच्या उद्योग क्षेत्रात अभिमानाने घेतलं जातं. रतन टाटा यांनी फक्त उद्योग क्षेत्रात नाव कमवलं नाही तर त्यांनी माणसं जपली. कोरोना काळात देशावर मोठं संकट कोसळलं होतं. त्यावेळी रतन टाटा यांनी आपल्या हॉटेल्स राज्य सरकारला रुग्णांना क्वारंटाईन करण्यासाठी मोफत दिलं होतं. त्यांच्या या मदतीमुळे राज्यातील कोट्यवधी नागरिकांना मोठी मदत झाली होती. रतन टाटा यांच्याकडे एक खरे देशभक्त म्हणून पाहिलं जायचं. त्यांच्याकडून प्रचंड सामाजिक कार्यदेखील झालं. याशिवाय त्यांनी टाटा ग्रुपच्या विविध कंपन्यांना यशाच्या सर्वोच्च शिखरावरही पोहोचवलं. त्यामुळे रतन टाटा यांचं नाव उद्योग क्षेत्रासोबतच सर्वसामान्यांमध्येदेखील आदराने घेतलं जातं. अशा या दिग्गज उद्योगपतीचं निधन झाल्याने देशभरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

रतन टाटा यांचे वडील जेआरडी टाटा यांनी 1991 मध्ये टाटा सन्सचे अध्यक्षपद सोडले आणि त्यांचा उत्तराधिकारी म्हणून रतन टाटा यांना नियुक्त केलं होतं. रतन टाटा यांना 1991 मध्ये टाटा सन्सच्या अध्यक्षपदाची जबाबदारी मिळाल्यानंतर उपकंपन्यांच्या प्रमुखांकडून तीव्र प्रतिकाराचा सामना करावा लागला होता. त्या सर्व गोष्टींचा प्रतिकार करत टाटा यांनी सर्वांचे हित जपत काम केलं. सर्वांची मने जिंकली. रतन टाटा यांनी 2012 मध्ये अध्यक्षपदाचा राजीनामा दिला.



## राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांचा बीड जिल्हयात विविध घटकांशी संवाद

दैनिक लोकआरंभ//

बीड दि. 9: राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी आज बीड जिल्हा दौऱ्यात शासकीय विश्रामगृह येथे लोकप्रतिनिधी, विविध राजकीय पक्षांचे प्रमुख नेते तसेच वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी यांच्याशी जिल्ह्यातील विविध विकास विषयक प्रश्नांवर सविस्तर चर्चा केली. तसेच उद्योग, संस्कृती, पर्यटन, साहित्य, माध्यम, उद्योजक तसेच विविध समाज घटकांशी संवाद साधून त्यांच्या जिल्ह्यांच्या विकासाबाबत असलेल्या अपेक्षा, अडचणी व संकल्पना जाणून घेतल्या.

यावेळी आमदार संदीप क्षीरसागर, आमदार नमिता मुंदडा, माजी आमदार सय्यद सलीम, माजी आमदार ॲड. उषा दराडे यांच्यासह विभागीय आयुक्त दिलीप गावडे, जिल्हाधिकारी अविनाश पाठक, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने, जिल्हा पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी,प्रशिक्षाणार्थी सहाय्यक जिल्हाधिकारी अर्पिता ठुबे यांच्यासह विविध विभागाचे प्रशासकीय प्रमुख उपस्थित होते.

राज्यपाल श्री. राधाकृष्णन यांच्या समोर मान्यवर व्यक्तींनी शेतकरी प्रश्न, सिंचन अनुशेष, जिल्हयातील पायाभूत सुविधा. 'उद्योगांसाठी पोषक वातावरण, ऊसतोड मजूरांचे स्थलांतर, आरोग्याच्या सुविधा, शहरातील पाणी प्रश्न यासारखे विषय मांडले.

बीड जिल्हयातून मोठया प्रमाणात ऊसतोड मजूरांचे कामासाठी काही कालावधीसाठी स्थलांतर होते, त्यामुळे जिल्हयातच रोजगाराच्या संधी निर्माण कराव्यात, केंद्र सरकारतर्फे मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देऊन भाषेचा गौरव करण्यात आला आहे. या मराठी भाषेतील प्रथम आद्य कवी हे बीड जिल्ह्यातील आहेत या पार्श्वभूमीवर अंबाजोगाई येथे मराठी भाषेचे विद्यापीठ व्हावे, बीड शहरातील पाणीपुरवठा योजनेचा प्रश्न सोडविण्यासोबतच कापूस उद्योगाला सहकार्य करावे. कापूस, सोयाबीनसह शेतीमालाला चांगला दर मिळावा, घरकुल योजना, शेतीसाठी वीज यासह विविध विषयावर चर्चागटात सहभागी मान्यवरांनी आपली मते मांडली. राज्यपाल श्री. राधाकृष्णन यांनी विविध घटकातील मान्यवरांचे म्हणणे ऐकून घेत सर्व मागण्या व विकास संकल्पनांबाबत लक्ष घालण्याबाबत आश्वस्त केले.

जिल्हाधिका-यांनी जिल्ह्यातील विविध योजनांचे सादरीकरण केले. या बैठकीला प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. यावेळी बैठकीत जिल्हयाचा ऐतिहासिक-सांस्कृतिक, भौगोलिक स्थिती व उद्योग तसेच जिल्हयात सुरू असलेल्या विविध कामाबाबत माहिती दिली.

## आपल्या हृदयाचे मंदिर झाले पाहिजे, तरच सुख आणि शांती नांदेल, इस्कॉनचे गौरंग दास प्रभुजी यांचे मत

गरजा कधीच संपत नाहीत, प्रत्येकाला नंबर वन व्हायचे आहे. माणसाच्या अपेक्षा आणि प्रत्यक्षात त्याला मिळणारे जीवन यात अंतर असल्याने माणसाला नैराश्याने घेरले आहे. त्यामुळे प्रत्येकाने आपल्या हृदयात मंदिर बांधवे, दुसऱ्याला मदत करावी तरच खरे समाधान सुख आणि शांती मिळेल असे इस्कॉनचे गौरंग दास प्रभुजी यांनी भगवतगीतेवरील आपल्या प्रवचनात सांगितले. ठाकूर दालान आणि होईचोई आनंदो फाऊंडेशन यांच्यावतीने माटुंगा येथील एसएनडीटी कॉलेजातील सभागृहात आयोजित दुर्गा महोत्सवात गौरंग दास प्रभुजी यांचे भगवतगीतेवर व्याख्यान झाले त्यावेळी ते बोलत होते. अहंकारामुळे दुर्योधनाचा विनाश झाला. दुर्योधन चांगल्या कारणासाठी लढला नाही. व्यक्तीने अहंकारावर मात करायला हवी. आपणच नंबर वन असायला हवे आपल्याखेरीज दुसरे कोणी असूच नये अशी महत्वाकांक्षा जगाला विनाशाकडे नेत आहे. दुर्याधनाला कुरुक्षेत्राच्या उन्हातही डोक्यावर छत्र धरणाराही कोणी नको होता. कारण त्याला आपल्या पेक्षा कोणी मोठे होतेय याची सतत भीती वाटायची. प्रत्येकाने अहंकारावर मात केली आणि हृदयाला आणि घराला मंदिर केले तर सुख आणि शांती नांदेल असेही गौरंग दास प्रभुजी यावेळी म्हणाले.मुंबईतील बंगाली लोकांच्या दुर्गा पूजा महोत्सवाचे उद्घाटन इस्कॉनचे गौरंग दास प्रभुजी यांच्या हस्ते माटुंगा येथील एसएनडीटी महाविद्यालयाच्या सभागृहात झाले त्यावेळी ते बोलत होते.यावेळी होईचोई आनंदो फाऊंडेशनचे अध्यक्ष सुजीत यांनी त्यांचे स्वागत केले.

## भगवान भक्तीगडावर स्वाभिमानी विचारांचे सिमोल्लंघन करण्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे

पाटोदा /प्रतिनिधी- राष्ट्रसंत भगवान बाबा यांचे जन्मस्थान असलेल्या सावरगांव घाट येथील भगवान भक्तीगडावर सध्या दसरा मेळाव्याच्या तयारीने वेग घेतला आहे.हा दसरा मेळावा हा विचारांचा वारसा आहे.या मेळाव्यात सर्वांनी बहुसंख्येने उपस्थित रहावे असे आवाहन आवाहन कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती तथा सरपंच संघटनेचे जिल्हाध्यक्ष पांडुरंग नागरगोजे यांनी केले आहे.

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर यंदाच्या या मेळाव्याकडे उभ्या महाराष्ट्राचे लक्ष लागून राहिले आहे.भाजपच्या राष्ट्रीय सचिव आ. पंकजाताई मुंडे आणि डॉ.प्रितमताई गोपीनाथ मुंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत दरवर्षी हा परंपरागत दसरा मेळावा अलोट जनसागराच्या साक्षीने मोठया उत्साहात पार पडत असतो.येत्या १२ तारखेला दसरा आहे, त्या अनुषंगाने 'आपला दसरा, आपली परंपरा' जपण्यासाठी संपूर्ण सावरगांव नगरी सज्ज होत असून सर्व ग्रामस्थ एकजुटीने कामाला लागले आहेत.मेळाव्याच्या तयारीसाठी कार्यकर्त्यांच्या राज्यभरात ठिक ठिकाणी बैठका सुरू आहेत.लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेबांनी दसरा



मेळाव्याची परंपरा सुरू केली होती ती परंपरा पुढे भाजपच्या राष्ट्रीय सचिव आ. पंकजाताई साहेब मुंडे यांनी अखंडपणे सुरू ठेवली आहे. ही परंपरा अशीच सुरू ठेवण्यासाठी स्वाभिमानी विचाराचे सीमोल्लंघन करण्यासाठी महाराष्ट्रातील वंचित, पिडीत, दलितांसह अठरापगड जाती धर्मातील समाजबांधवांनी आपली वज्रमूठ घट्ट ठेवण्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती तथा सरपंच संघटनेचे जिल्हाध्यक्ष पांडुरंग नागरगोजे यांनी केले आहे.

# २५० सोलर हायमास्टने बीड शहर उजळणार

## डीपीसीतून ६ कोटींचा निधी; ना.धनंजय मुंडे यांचे डॉ.योगेश क्षीरसागर यांनी मानले आभार

बीड (प्रतिनिधी) दि.९ : शहरातील नागरिकांच्या मागणीनुसार विजेचा प्रश्न सोडविण्यासाठी डीपीसीतून ६ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. त्यातून २५० सोलर हायमास्ट बसविण्यात येणार असल्याने शहर उजळणार आहे. यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या पाठपुराव्यातून निधी मिळाला असून पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांचे भरीव निधी दिल्याबद्दल आभार मानले आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार, पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांच्या माध्यमातून बीड विधानसभा मतदारसंघातील शहर व ग्रामीण





भागासाठी कोट्यवधींचा निधी मिळाला आहे. त्यातील अनेक विकासकामे प्रगतीपथावर आहेत. अलिकडे शहरातील अनेक भागात पथदिवे बंद असल्याच्या नागरिकांच्या तक्रारी होत्या. हे पथदिवे सुरू करून अंधार दूर करावा, अशी मागणी नागरिकांमधून होत होती. या मागणीची दखल घेऊन डॉ.योगेश क्षीरसागर यांनी पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांच्याकडे पाठपुरावा केला. त्यानंतर डीपीसीतून ६ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध झाला असून त्यातून २५० सोलर हायमास्ट बसविण्यात येणार आहेत. तसेच, शहरातील अनेक जुन्या पोलवरील पथदिवे बंद आहे. त्याठिकाणी देखील एलईडी पथदिवे बसविले जाणार आहेत. या कामाला प्रत्यक्षात सुरुवात झाली असून दिवाळीच्या आधीच बीड शहर उजळणार असल्याने नागरिकांमधून समाधान व्यक्त केले जात आहे.

### बीड मतदारसंघात कोट्यवधींची कामे प्रगतीपथावर

बीड विधानसभा मतदारसंघात कोट्यवधींची विकासकामे प्रत्यक्षात सुरु आहेत. अनेक कामे पूर्णत्वास गेली असून काही कामे प्रगतीपथावर आहेत. रस्ते, नाल्या, पथदिव्यांसह विजेची कामे, सभागृह, अंगणवाडी, दवाखान्यांसह विविध दुरुस्तीच्या कामांचा देखील यामध्ये समावेश आहे. या कोट्यवधींच्या विकासकामांसाठी डॉ.योगेश क्षीरसागर यांनी उपमुख्यमंत्री ना.अजित पवार, पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा करून निधी उपलब्ध करून दिला आहे.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकः राहुल मारोतीराव वाईकर
गुरुवार १० ऑक्टोबर २०२४
https://lokaarambh.com




# डॉ. आशा अशोक ब्राम्हणे: एक ध्येयवेडी शिक्षिका

मुंबईसारख्या धकाधकीच्या शहरात, जिथे प्रत्येकजण पैशामागे धावतो, तिथे मच्छीमार आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल समाजातील मुलांसाठी शिक्षणाचा दीप लावणारी, समाजसेवेचे व्रत घेतलेली ध्येयवेडी शिक्षिका डॉ. आशा अशोक ब्राम्हणे यांनी आपले संपुर्ण जीवन विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी समर्पित केले आहे. मढ, मुंबई येथील शाळेत त्यांनी जोपासलेला शिक्षणप्रेम, त्यांनी केलेले परिश्रम आणि त्यांनी घडवलेले कर्तव्यदक्ष सुजान नागरिक पाहून प्रत्येकाच्या मनात त्यांच्या कार्याबद्दल आदर निर्माण होतो. डॉ. आशा ब्राम्हणे यांची कर्तव्यनिष्ठा फक्त त्यांच्याच वर्गात मर्यादित राहिली नाही, तर त्यांनी अनेक अशा विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी अथक परिश्रम घेतले, ज्यांच्याकडे दुर्लक्ष झाले होते. मच्छीमार समाजातील गरिबांची मुले, ज्यांना साधनांची कमतरता आहे, त्यांनी शिक्षणाच्या महत्त्वाकडे वळावे, शिक्षणाच्या माध्यमातून जीवनात सुधारणा करावी, या उद्दिष्टाने त्या रात्रंदिवस झटत राहिल्या. त्या केवळ एक आदर्श शिक्षिका नाहीत, तर त्या एक उत्कृष्ट कवयित्री, साहित्यिका आणि संशोधकही आहेत. राज्य शासनाचा आदर्श शिक्षिका पुरस्कार प्राप्त करताना त्यांनी आपल्या कार्यक्षेत्रात ठसा उमटवला आहे. त्यांच्या सृजनशीलतेचा ठसा त्यांनी कविता आणि साहित्य क्षेत्रातही उमटवला आहे. विद्यार्थ्यांच्या शिक्षणात गुणवत्ता आणण्याच्या त्यांच्या असामान्य प्रयत्नांना सर्वत्र प्रशंसा मिळाली आहे. डॉ. आशा ब्राम्हणे यांनी विद्यार्थ्यांसाठी केवळ पुस्तकी शिक्षणच दिले नाही, तर जीवनात उभे राहण्यासाठी आवश्यक असलेले नैतिक मूल्य आणि आदर्शही त्यांना दिले. त्यांनी सुरू केलेल्या शालेय उपक्रमांमुळे विद्यार्थी शिक्षणाकडे आकर्षित झाले, त्यांचा आत्मविश्वास वाढला, आणि शिक्षणातून पुढे जाण्याची प्रेरणा मिळाली. त्यांची शिक्षणप्रणाली केवळ अभ्यासावर भर देणारी नसून, विद्यार्थ्यांना जीवनाचा मार्ग दाखवणारी आणि सामाजिक भान जोपासणारी आहे. मुंबईसारख्या व्यग्र शहरात, जिथे साधनसंपन्नता नसलेल्या वर्गाच्या मुलांना दुर्लक्षित केले जाते, तिथे डॉ. आशा ब्राम्हणे यांनी आपली संपूर्ण ऊर्जा विद्यार्थ्यांच्या भविष्यावर केंद्रित केली आहे. त्यांची ही जिद्द आणि अथक कार्य पाहून आजही त्या लाखो विद्यार्थ्यांसाठी प्रेरणास्त्रोत बनल्या आहेत. एवढेच करुन त्या थांबल्या नाहीत तर समाज जीवन ही विकसित करण्यासाठी त्यांनी कवितांच्या माध्यमातून साहित्याचे लिखाण करुन चांगले विचार समाजासमोर मांडले. त्यांनी अनेक सामान्य व्यक्तिंचा एखादा छोटा चांगला गुण ओळखुन, त्याच्या कलागुणांना समोर आणण्यासाठी त्या व्यक्तीच्या पाठीवरून हात फिरवुन त्याला मोठा केला. असे अनेक कवी साहित्यिका कडुन त्यांनी समाज सेवा घडवुन घेतली. या डाँ. आशा ब्राम्हणे म्हणजे एक प्रभावी व्यक्तिमत्व ,स्वतःच्या जीवाची पर्वा न करता आजारी असतांना सुद्धा शाळेतील मुलांच्या भविष्याचा विचार करुन, शाळेला कधी ही खाडा न करता .मुलांना ज्ञान देण्याच कार्य सतत सुरुच ठेवल. आशा कर्तव्य दक्ष शिक्षिका, व कवयित्री लेखीका या समाजाला पुन्हा भेटणे कठीणच .म्हणुन त्यांच्या या परिश्रमाचा गौरव करण्यात यावा अस मला वाटत. अशा या डाँ. आशा ब्राम्हणे समाजा साठी ही एक आदर्शच ठरल्या आहेत.

लेखक
गोरखनाथ पवार( निंभारी )
९७६३७३८१८०

# खांडेपारगावचे माजी सरपंच अशोक आमटेंचा राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश

## डॉ.योगेश, डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांचे रॅली काढून जल्लोषात स्वागत

दैनिक लोकआरंभ//

बीड (प्रतिनिधी)दि.९ : विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात इनकमिंग सुरूच आहे. बीड तालुक्यातील खांडेपारगावचे माजी सरपंच अशोक आमटे यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. हा प्रवेश सोहळा खांडेपारगाव येथे पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर, डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांच्या प्रमुख उपस्थितीत बुधवारी (दि.९) उत्साहात पार पडला. ग्रामस्थांच्यावतीने डॉक्टर दाम्पत्याचे फुलांची उधळण करत हलगीच्या तालावर जल्लोषात स्वागत करण्यात आले. डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून बीड विधानसभा मतदारसंघातील दररोज प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते पक्षात प्रवेश करून खंबीर साथ देत आहेत. माजी सरपंच अशोक आमटे यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे



राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री ना.अजित पवार, पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांच्या विचाराने प्रेरित होवून डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखाली कार्यकर्त्यांसमवेत पक्षात प्रवेश केला. यावेळी त्यांचा सत्कार करून डॉक्टर दाम्पत्याने स्वागत केले. यावेळी सरपंच ॲड.राजेंद्र राऊत, राष्ट्रवादी काँग्रेस ग्रंथपाल जिल्हाध्यक्ष भागवत आमटे, हनुमंत बोरगे, गोविंद खुरणे, पं.स.चे माजी सभापती सखाराम ठोकळ, सरपंच रामेश्वर आनेराव, हरिभाऊ आमटे, नवनाथ सपकाळ, माणिकभाऊ आमटे, मधुकर वाघमारे, राहुल साळुंके, ईश्वर धनवे, माजी सरपंच मसुराम साळुंके, नागापूर खु.चे सरपंच किशोर ढोकणे, मा.सरपंच तुकाराम जाधव, वसंत शिंदे, धर्मराज सोळूंके, अर्जुन अवघड, बाळू आमटे, मिलिंद ठोकळ, रमेश आमटे, धीरज कदम, जगदीश सपकाळ, अशोक वाघमारे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### डॉ.योगेश क्षीरसागरांसारख्या नेतृत्वाची बीड मतदारसंघाला गरज-अशोक आमटे

गेल्या दोन वर्षापासून आपण डॉ.योगेश क्षीरसागर व डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांचे राजकीय, सामाजिक कार्य पाहत आलो आहे. मतदारसंघाला विकासाच्या वाटेवर नेण्याची क्षमता त्यांच्यामध्ये आहे. त्यांच्यासारख्या नेतृत्वाची बीड मतदारसंघाला गरज असून आगामी विधानसभा निवडणुकीत आपण त्यांच्या मागे ताकद उभी करणार असल्याचे माजी सरपंच अशोक आमटे यांनी म्हटले आहे.

# बिंदुसरा धरणात घातकी पर्यटन करणारांवर अंकुश ; महसूल व पोलीस प्रशासन सतर्क : हुल्लडबाजांना हुसकावून लावले:- डॉ.गणेश ढवळे




बीड:- ( दि.०९ ) बीड शहरापासून जवळ आणि धुळे - सोलापूर राष्ट्रीय महामार्गालगत सध्याचे पर्यटन केंद्र असलेले बिंदुसरा धरणात सध्या घातकी पर्यटन सुरू असुन याबाबतीत सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांनी पुराव्यानिशी तहसीलदार बीड, ग्रामीण पोलीस स्टेशन यांना लेखी तक्रारी द्वारे संभाव्य धोक्याची दाट शक्यता असल्याची तक्रार करत आवश्यक उपाययोजना करण्यात येऊन सुरक्षारक्षकाची मागणी करण्यात आली होती. याची दखल घेत महसूल आणि पोलिस प्रशासन सतर्क झाले असुन तलावाची भिंत, चादरीवर फिरणारे तसेच तलावात आणि सांडव्याच्या डोहात पोहणा-यांवर अंकुश लावत सुरक्षा रक्षकांची नेमणूक केली आहे.

बिंदुसरा मध्यम प्रकल्प दिड महिन्यापुर्वीच जोरदार पावसाने तुडुंब भरले असुन चादरीवरून पाणी ओसंडून वाहत आहे. बीड शहरापासुन १० किलोमीटर अंतर असल्याने बीडकरांसाठी हे पर्यटन केंद्र झाले आहे. धुळे -सोलापुर राष्ट्रीय महामार्गावरील लांब पल्ल्याच्या जड वाहनांचे चालक देखील आंघोळीची सोय म्हणून धरणाच्या पाण्यात उतरत आहेत. हौशी व पर्यटक मोठी भिंत, सांडवा,चादरीवरून चालत फोटो सेशन करत आहेत.दरम्यान संपूर्ण तलाव गाळयुक्त आहे. त्यात सतत पाण्यानेही तलावाच्या कडेला गाळ साचला आहे.पर्यटक यात पोहण्यासाठी उड्या मारतात.त्यामुळे गाळात फसुन बुडण्याचा धोका आहे. तसेच ३ वर्षांपूर्वी दि.१९ आक्टोबर २०२१ रोजी बिंदुसरा प्रकल्पाच्या सांडव्यातील पाण्याच्या डोहात बुडून ओंकार लक्ष्मण काळे ( वय १६ ) व



शिव संतोष पिंगळे ( वय १६) दोघेही रा.बीड या युवकांचा दुर्दैवी अंत झाला होता. त्यामुळे संभाव्य धोका टाळण्यासाठी आवश्यक उपाययोजना करत सुरक्षा रक्षकाची नेमणूक करण्यात यावी अशी मागणी डॉ.गणेश ढवळे यांनी लेखी निवेदनाद्वारे केली होती.याची दखल घेत बीड तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या सुचनेवरून पाली सज्जाचे तलाठी अनिल गायकवाड, ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलिस कर्मचारी शेख रज्जाक, दिलीप घोलप,तुकाराम नागरगोजे,प्रशांत वीर यांचे पथक बिंदुसरा धरणाभोवती गस्त घालत असुन घातकी पर्यटन करणा-यांना हुसकावून लावले जात आहे.

# बीड जिल्ह्यामध्ये झालेल्या राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमांतर्गत भ्रष्टाचाराची चौकशी करण्यासंदर्भात आरोग्य मंत्री तानाजी सावंत साहेब यांना निवेदन देऊन तक्रार केली

बीड जिल्हा रुग्णालयातील भ्रष्टाचाराच्या बाबतीत सातत्याने वेगवेगळे घोटाळे ओपन होत आहेत यामध्येच शहरी भागातून ग्रामीण भागामध्ये डॉक्टरांना घेऊन जाण्यासाठी आणि येण्यासाठी अंगणवाडी शाळा तपासणीसाठी राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमांतर्गत अमर टूर्स अँड ट्रॅव्हल्स एजन्सीला शासकीय कंत्राट मिळालं होतं मात्र बीड जिल्हा रुग्णालयातील सिविल सर्जन आणि टेंडर विभागातील तांगडे यांच्या संगणमताने अमर टूर्स अँड ट्रॅव्हल्स एजन्सी 2021 पासून 2024 अधिकाऱ्यांनी कर्मचाऱ्यांच्या संगणमताने शासनाने घालून दिलेल्या कोणत्याही नियमाचे पालन न करता प्रत्येक महिन्याला लाखो रुपयांचा अपार केला आहे अंदाजे तीन ते चार कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झाला आहे यासंदर्भात आज महाराष्ट्र राज्याचे आरोग्य मंत्री नामदार तानाजी सावंत साहेब



यांची मुंबईतील लोहगड या शासकीय निवासस्थानी भेट घेऊन बीड जिल्ह्यामधील या प्रतीक भ्रष्टाचाराबाबत विशेष लेखा परीक्षण करून अमर टूर्स अँड ट्रॅव्हल्स एजन्सी दोशी बीड जिल्हा रुग्णालयातील अधिकारी कर्मचारी यांच्यावर कारवाई करण्यासंदर्भात ची मागणी केली आहे 2021 पासून 24 पर्यंत लावण्यात आलेल्या प्रत्येक गाड्याचे स्पेशल ऑडिट आणि व्हेरिफिकेशन आरटीओ मार्फत तपासणी करून आजपर्यंत देण्यात आलेल्या बिलाची सुद्धा चौकशी करून गाड्यांचे फिटनेस प्रमाणपत्र तपासण्या संदर्भाची मागणी केली आहे आठ दिवसाच्या कारवाई झाली नाही तर लोकशाही मार्गाने मंत्रालयासमोर किंवा बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लोकशाही मार्गाने उपोषण करण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा उपसरपंच मुकुंद गोरे पाटील यांनी केली आहे

# कर्मयोगी आबासाहेबफचित्रपटाचे पोस्टर व टिझर प्रदर्शित चित्रपट २५ ऑक्टोबरला जगभर प्रदर्शित होणार

बीड (प्रतिनिधी) - सोलापूर जिल्ह्याचे सुपुत्र, बीड जिल्ह्याचे जावई तथा पुणे येथे स्थायिक झालेले प्रसिद्ध लेखक, दिग्दर्शक अल्ताफ दादासाहेब शेख यांचा मा. कृषीमंत्री ना.स्व. गणपतराव उर्फ आबासाहेब देशमुख यांच्या जीवनावर आधारित 'कर्मयोगी आबासाहेब' या चित्रपटाच्या पोस्टरचे प्रदर्शन मा. कृषीमंत्री ना. गणपतराव देशमुख यांचे सहकारी मा. कृषीमंत्री ना. दादासाहेब जाधवराव यांच्या हस्ते करण्यात आले. याशिवाय ८ ऑक्टोबर २०२४ मंगळवार रोजी या चित्रपटाचा टिझर ही प्रदर्शित करण्यात आला. याप्रसंगी ना. दादासाहेब जाधवराव यांना दिग्दर्शक,लेखक अल्ताफ दादासाहेब शेख



आणि सत्यशोधक बहुउद्देशीय सामाजिक संस्थेचे संस्थापक/ अध्यक्ष विशाल धेंडे यांनी कर्मयोगी आबासाहेब चित्रपटाचे पोस्टर फ्रेम भेट दिली. येत्या २५ ऑक्टोबर २०२४ रोजी संपूर्ण जगभरात हिंदी आणि मराठी भाषेत प्रदर्शित होणाऱ्या कर्मयोगी आबासाहेब चित्रपटाला प्रदर्शनापूर्वीच आंतरराष्ट्रीय दर्जाचे तीन पुरस्कार मिळाले. वर्ल्ड बुक रेकॉर्डला नोंद झाल्यामुळे ऑस्करसाठी चित्रपटाची रवानगी करण्यात आली आहे. कर्मयोगी आबासाहेब या चित्रपटाची इंटरनॅशनल फिल्म फेस्टिवल मध्ये देखील निवड झाली आहे. परदेशात कर्मयोगी आबासाहेब या चित्रपटाचे स्क्रीनिंग झाले आहे. रसिक श्रोते या चित्रपटाची आतुरतेने वाट पाहत आहेत.

# पाच वर्षात जमलं नाही ते विजयसिंहांनी महिनाभरात करुन दाखविले गेवराई तालुक्यातील १२०६० निराधारांचे अर्ज मंजुर

गेवराई (प्रतिनिधी) दि. ९ तालुक्यातील निराधारांच्या प्रश्नांवर सातत्याने राजकीय पोळी भाजण्याचे काम आजवर सत्ताधाऱ्यांकडुन होत होते. राज्यातील सत्तांतरानंतर विजयसिंह पंडित यांनी राजकीय प्रतिष्ठापणाला लावुन संजय गांधी निराधार अनुदान समितीचे गठण केले. दादासाहेब घोडके यांच्या अध्यतेखालील समिती कार्यरत होताच त्यांनी अतिशय तत्परतेने निराधारांची प्रकरणे हाताळली. प्रशासकीय यंत्रणेला समिती सदस्यांनी अक्षरशः खांद्याला खांदा देवुन दिवसरात्र एक करत गेवराई तालुक्यातील प्राप्त झालेल्या १५६३० एकुण अर्जांची बारकाईने तपासणी करुन १२०६० अर्ज मंजुर करत खऱ्या अर्थाने निराधारांना न्याय देण्याचे काम केले. विरोधकांना सत्तेत असतांनाही पाच वर्षात जे जमलं नाही ते विजयसिंह पंडित यांनी महिण्याभरात करुन दाखविल्याची चर्चा गेवराई तालुक्यात आहे.

गेवराई तालुक्यातील निराधारांचा प्रश्न सातत्याने ऐरणीवर आला की, त्यावर राजकीय वाद आजवर होत आले आहेत. केलेल्या कामाचे श्रेय घेण्यासाठी अक्षरशः विधवा, दिव्यांग आणि निराधारांना तहसिल कार्यालयात बोलावुन आमदारांच्या हाताने मंजुरी पत्र वाटप करण्याचे केविलवाने प्रकारही आजवर गेवराईत घडलेले आहेत. निराधारांमध्ये सुद्धा राजकारण करुन विशिष्ट गटाच्या लोकांना प्राधान्य देण्याचे प्रकार यापुर्वी घडले होते. लाच घेवुन अर्ज मंजुर केलेल्याचे आरोप यापुर्वीच्या समितीवर मोठ्या प्रमाणावर झाले. बीड जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष विजयसिंह पंडित यांनी मोठा मोर्चा काढुन या प्रश्नाला वाचा फोडली होती. शेवटी राज्यातील सत्तांतरानंतर त्यांनी राजकीय प्रतिष्ठापणाला लावुन पालकमंत्री ना. धनंजय मुंडे यांच्या माध्यमातुन नविन समिती गठीत केली. दादासाहेब घोडके यांच्या अध्यक्षतेखाली नवनियुक्त समिती सदस्यांनी प्रयत्नांची पराकाष्टा करत तहसिल कार्यालयात आजवर प्रलंबित असलेल्या सुमारे १५६३० अर्जांची प्रत्यक्ष तपासणी केली.

गेवराई तालुका संजय गांधी निराधार अनुदान योजना समितीने दि. २० सप्टेंबर रोजीच्या बैठकीत १२०६० अर्ज मंजुर केले आहेत. यामध्ये श्रावण बाळ निराधार ६८७४, संजय गांधी निराधार ५१५४ आणि इंदिरा गांधी वृद्धपकाळ निराधार योजने मधील ३२ अर्जांचा समावेश आहे. एकाच वेळी एवढ्या मोठ्या प्रमाणावर अर्ज मंजुर करण्याची गेवराई तालुक्यातील ही पहिलीच घटना आहे. समिती सदस्यांनी लाभार्थ्यांकडुन कोणतीही अपेक्षा न ठेवता प्रामाणिकपणे काम केले आहे. त्यामुळे विरोधकही आमच्यावर आरोप करु शकत नाहीत. तालुक्यातील निराधारांना यामुळे खऱ्या अर्थाने न्याय मिळाल्याची भावना समितीचे अध्यक्ष दादासाहेब घोडके यांनी व्यक्त केली. त्यांनी पालकमंत्री ना. धनंजय मुंडे, माजी आ. अमरसिंह पंडित आणि बीड जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष विजयसिंह पंडित यांचे आभार व्यक्त केले. यावेळी समितीचे सदस्य ज्ञानेश्वर नवले, सरवर पठाण, भारत गर्जे, बळीराम शिंदे, गोकुळ चोरमले, शाहीन पठाण, अनिरुद्र तौर, अंबादास सांगळे, शामसुंदर शिंदे आदींची उपस्थिती होती. गेवराई तालुक्यातील निराधारांकडुन आनंद व्यक्त करण्यात येत आहे

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकः राहुल मारोतीराव वाईकर
गुरुवार १० ऑक्टोबर २०२४
https://lokaarambh.com



# ओबीसीत १५ जाती येणारः लढणा-या मराठा समाजाचं काय?; उघड झालेली संपूर्ण यादी तुम्ही वाचा





मराठा नेते मनोज जरांगे पाटील यांच्याकडून मराठा समाजाला ओबीसी कोट्यातून आरक्षण मिळावं, अशी मागणी केली जात आहे. मनोज जरांगे आपल्या मागण्यांसाठी वारंवार आक्रमक होताना दिसत आहेत. राज्य सरकारने आपल्या मागण्या मान्य केल्या नाहीत तर महायुतीला आगामी विधानसभा निवडणुकीत पराभवाला सामोरं जावं लागेल, असा इशारा मनोज जरांगे यांनी दिला आहे. एकीकडे मनोज जरांगे यांची मराठ्यांना ओबीसीमधून आरक्षण देण्याची मागणी केली जात आहेत. तर दुसरीकडे आणखी एक मोठी बातमी आता समोर येत आहे. महाराष्ट्रातील 15 जातींची ओबीसींच्या यादीसाठी शिफारस करण्यात आली आहे. राज्य सरकारकडून इतर मागासवर्ग ओबीसींच्या यादीत नव्या जाती समाविष्ट करण्याची शिफारस केंद्र सरकारकडे करण्यात आली आहे. त्यामुळे महाराष्ट्र सरकारने शिफारस केलेल्या जातींचा समावेश ओबीसीमध्ये करण्याच्या प्रक्रियेला वेग आला आहे. केंद्रीय मागासवर्ग आयोगाकडून जातींची यादी केंद्र सरकारकडे सुपूर्द करण्यात आल्याची माहिती समोर येत आहे. या सर्व 15 जातीच्या नागरिकांची लोकसंख्या ही तब्बल 10 लाख इतकी आहे महायुतीला थेट फायदा होणार?आगामी विधानसभा निवडणूक तोंडावर असताना राज्य सरकारकडून राज्यातील 15 जातींना ओबीसीमध्ये समाविष्ट करण्यासाठी केंद्र सरकारकडे शिफारस करण्यात आली आहे. राज्यात या 15 जातींना ओबीसी कोट्यातील आरक्षण मिळाल्यास आगामी निवडणुकीत महायुतीला त्याचा थेट फायदा होण्याची शक्यता आहे. कारण या 15 जातीच्या नागरिकांची लोकसंख्या राज्यात 10 लाख इतकी आहे. त्यामुळे 10 लाख मतांचा आकडा महायुतीसाठी फायद्याचा ठरु शकतो. राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत आणखी एक मोठा निर्णय होणार?दरम्यान, राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत उद्या आणखी एक मोठा निर्णय होणार असल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. नॉन क्रिमिलियरची मर्यादा वाढवण्यासंदर्भात राज्य सरकार केंद्र सरकारला शिफारस करणार आहेत. नॉन क्रिमिलियरची मर्यादा 8 लाखांवरून 15 लाख करण्यासंदर्भात राज्य सरकार केंद्र सरकारकडे शिफारस करणार आहे. आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारचा हा मोठा निर्णय असणार आहे. नॉन क्रिमिलियरची मर्यादा वाढल्यानंतर ओबीसी, मराठा आणि इतर समाजातील आरक्षणाचा लाभ घेणाऱ्या नागरिकांना मोठा फायदा होणार आहे. नॉन क्रिमिलियरची मर्यादा पंधरा लाख रुपये केली तर अनेक वरिष्ठ सरकारी अधिकाऱ्यांनाही याचा लाभ मिळणार आहे. उद्या अकरा वाजता सह्याद्री अतिथीगृह येथे होणाऱ्या मंत्रीमंडळ बैठकीत याबाबत निर्णय घेतला जाणार असल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे.

### या' जातींचा होणार ओबीसीत प्रवेश

बडगुजर
सूर्यवंशी गुजर
लेवे गुजर
रेवे गुजर
रेवा गुजर
पोवार, भोयार, पवार
कपेवार
मुन्नार कपेवार
मुन्नार कापू
तेलंगा
तेलंगी
पेंताररेड्डी
रुकेकरी
लोध लोधा लोधी
डांगरी




शिवसेनेचे दोन्ही जिल्हाप्रमुख गणेश भाऊ वरेकर व परमेश्वर सातपुते सर यांनी आज बीड तालुक्यातील विविध गावातील नवरात्र उत्सवानिमित्त आयोजित विविध उत्सव समितींच्या देवीची आरती केली व सर्वांना नवरात्रीच्या शुभेच्छा दिल्या. ◼ मौजे जरुड,हरकुबाबा वस्ती वरील देवीची आरती करून मनोभावे दर्शन घेतले. ◼ मौजे कुटेवाडी गावातील सार्वजनिक नवरात्र उत्सव समितीच्या देवीची आरती करून मनोभावे दर्शन घेतले व उपस्थित सर्व गावकऱ्यांना नवरात्रीच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी तालुका प्रमुख गोरख आण्णा सिंघण,अंगद महाराज सातपुते,सोहम महाराज सातपुते, सखाराम तात्या मोहिते,ऋषी भैय्या गिरी,शाम काकडे, प्रकाश काकडे, मच्छिंद्र काकडे सह सर्व उपस्थित होते..!!




टाटा उद्योग समूहाचे सर्वेसर्वा आणि जगातील मोठे उद्योगपती रतन टाटा यांचे बुधवारी (9 ऑक्टोबर) निधन झाले. ते 86 वर्षांचे होते. भारताच्या उद्योग क्षेत्रातील बापमाणूस म्हणून त्यांची ओळख होती. त्यांच्या निधनाने केवळ उद्योगजगतावर नव्हे तर संपूर्ण देशावर शोककळा पसरली आहे. रत्न टाटा यांना प्रकृती खालावल्याने ब्रीच कँडी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. पण उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली. रत्न टाटा यांच्या निधनानंतर कोट्यवधी भारतीयांच्या डोळ्यात पाणी पाहायला मिळत आहे. तसेच रत्न टाटा यांच्या निधनानंतर देशभरातून मान्यवरांच्या प्रतिक्रिया समोर येत आहेत. तसेच सोशल मीडियाद्वारे त्यांना श्रद्धांजली वाहिली जात आहे.

## महायुतीत अनेक मतदारसंघात मित्रपक्षांच्या दावेदारीवरुन ठिणग्या



जिथून जो आमदार असेल, ती जागा त्याच पक्षाला हे सूत्रं महायुतीत ठरलंय. मात्र तरीही अनेक मतदारसंघात मित्रपक्षांच्या दावेदारीवरुन ठिणग्या उडू लागल्या आहेत. नाशिकमधला नांदगाव मतदारसंघ. सध्या शिंदे गटाचे सुहास कांदे इथून आमदार आहेत. पण नांदगावात अजितदादा गटाच्या समीर भुजबळांचे बॅनर लागलेत. खुद्द छगन भुजबळांनीही नांदगावसाठी आपल्या पुतण्याला शुभेच्छा दिल्यात त्यावर आम्ही पण येवल्याची जागा मागायची का., असा सवाल शिंदे गटाचे मंत्री दादा भुसेंनी केला आहे.2019 ला अखंड शिवसेनेच्या सुहास कांदेंविरोधात अखंड राष्ट्रवादीचे पंकज भुजबळ उभे होते. पंकज भुजबळांचा 13 हजार 889 मतांनी पराभव झाला होता. वंचित आघाडीच्या उमेदवारालाही जवळपास साडे १३ हजार मतं पडली होती. कोल्हापूरच्या कागलमध्ये अजित पवारांच्या हसन मुश्रीफांविरोधात शिंदे गटाच्या विरेंद्र मंडलिकांनी दंट थोपटण्याची तयारी केलीय. शिंदेंच्या शिवसेनेच्या युवासेनेचे निरीक्षक असलेल्या वीरेंद्र मांडलिकांनी समर्थकांचा मेळावाही बोलवला आहे. कागल मधील नैसर्गिक जागा शिवसेनेची त्यामुळे महायुतीत जागा शिवसेनेलाच मिळावा यासाठी मुख्यमंत्र्यांकडे आग्रह करणार. हसन मुश्रीफ यांनी कायम खेकड्याप्रमाणे माझे पाय ओढले. असंही ते म्हणाले.

## वंचित बहुजन आघाडीचे बीड जिल्हा उपाध्यक्ष तसेच बहुजन विकास आघाडीचे पॅनलप्रमुख मा. राजाभाऊ पोकळे यांनी स्वत:च्या खिश्यातून पैसे खर्च करुन ५ दिवसांपासून अंधारात असलेली बहुजन वस्ती प्रकाशमय केली

वंचित बहुजन आघाडीचे बीड जिल्हा उपाध्यक्ष तसेच बहुजन विकास आघाडीचे पॅनलप्रमुख मा. राजाभाऊ पोकळे यांनी बहुजन वस्ती भागातील डीपी आणण्यासाठी तसेच लोंबकळलेल्या तारा ताणून घेवुन कामठी बांधुन घेण्यासाठी स्वत:च्या खिश्यातून पैसे खर्च करुन ५ दिवसांपासून अंधारात असलेली बहुजन वस्ती प्रकाशमय केली त्याबद्दल मा. राजाभाऊ पोकळे यांचे मी बहुजन (साठेनगर, भिमनगर, ढोर गल्ली, माळी गल्ली, वाघवाले वस्ती) यांच्यावतीने धन्यवाद मानून जाहिर आभार व्यक्त करतो. अत्तापर्यंत अनेक गाव पुढाऱ्यांनी उमापुर येथे सत्ता भोगली त्यांनी बहुजन वस्तीकडे (ज्या भागात गरीब मराठा, माळी, तेली, मांग, महार, ढोर, चांभार, मुस्लीम,घिसाडी, वडार राहतात ती वस्ती म्हणजे बहुजन वस्ती) कायम दूर्लक्ष करुन विकासापासून दूर ठेवले. चालायला निट रस्ता नाही, पिण्यासाठी सोडा साधे वापरण्यासाठी वेळेवर कधी नळाला पाणी सोडले नाही,



सांडपाणी वाहून नेण्यासाठी व्यवस्थापन नाही, कचऱ्याचे व्यवस्थापन नाही. विज प्रवाह वाहून नेनाऱ्या तारा जिर्ण होऊन लोंबकळत असल्याने सतत तुटतात तर कधी एकमीकीस स्पर्श झाल्याने डिपी उडते आणि ५ ते ८ दिवस या बहुजन समाजाला आंधारात रात्री काढाव्या लागतात, सत्ता भोगलेला कोणताच पुढारी डिपी आणुन देत नाही.

### अब बराबरी की बात होंगी...!ये ताकद आप भाईयो के बदोलत है..!

## AIMIM बीड जिल्हा अध्यक्ष #ॲड_शेख_शफिक_भाऊ यांनी महाराष्ट्राचे महामहीम राज्यपाल यांच्या समवेत संवाद

* सर्व जातीतील धर्मातील देवी,देवता, धार्मिक पुस्तके यांच्या बद्दल बोलणाऱ्या कडक करावा.
* विशेष करुन मुस्लिम धर्मातील अल्लाह व प्रॉफेट मोहम्मद साहेबा बद्दल बोलणाऱ्या वर कडक कारवाई करावी व अजामीनपात्र असा कायदा आमलात आणावा.
* वन नेशनल वन इलेक्शन या प्रस्तावाचा विरोध.
*जिल्हा रुग्णालयासाठी MRI मशीन ची मागणी केली.



*वृक्ष तोडणीसाठी आणलेल्या नवीन कायदे अतंर्गत 1000 हजार रुपये एवजी 50000 रुपये दंडाचा निर्णय घेतला तो रद्द करण्यात यावा. ही मागणी बीड जिल्हा सॉ मील असोसिएशन आणि शेतकऱ्यांच्या वतीने केली.
*मुस्लिम आरक्षण आणि संरक्षण कायदा आमलात आणावा.



आज दि. 9/10/2024 रोजी महाराष्ट्राचे राज्यपाल सन्माननीय सि.पी. राधाकृष्णन साहेब बीडला आले होते, यानिमित्ताने बीड नगरपरिषदेचे माजी सभापती तथा शरद पवार राष्ट्रवादी कॉंग्रेसचे शहराध्यक्ष खुर्शीद आलम यांनी राज्यपाल मार्फत सन्माननीय राष्ट्रपती श्रीमती द्रोपदी मुरमुर यांना निवेदन देण्यात आले आहेत, निवेदनात म्हटलें आहे की SC प्रमाणे मुस्लिमांसाठी संरक्षण कायदा करा, २) T.v. चैनलावर होणाऱ्यांना हिंदू-मुस्लिम डिबेट बंद करा, 3) प्रक्षोभक विडीओ टाकणाऱ्यावर कडक कायदे करा असे निवेदन देण्यात आले आहेत, यावेळी खुर्शीद आलम यांच्या सह OBC जिल्हाध्यक्ष शेख जाकेर भाई, हकीम भाई मन्यार,रफु सेठ, मोहम्मद शहेबाज वगैरे दिसत आहेत,

## भारत कवितके यांना त्यांच्या वाढदिवशीच दिशा शक्ती मिडिया समुहाचा राज्य स्तरीय समाज भूषण पुरस्कार प्रदान करण्यात आला.

दिशा शक्ती मिडिया प्रतिनिधी. पत्रकार, साहित्यिक, गीतकार, सामाजिक कार्यकर्ता, भारत कवितके मुंबई कांदिवली पश्चिम यांना त्यांच्या वाढदिवशीच 8 आक्टोंबर ला दिशा शक्ती मिडिया समुहाचा राज्य स्तरीय समाज भूषण पुरस्कार प्रदान करण्यात आला.सदर पुरस्कार अड.वैभव गरगडे ( उच्च न्यायालय मुंबई) यांनी हा पुरस्कार भारत कवितके यांना देऊन सन्मानित केले. मंगळवार दिनांक 8 आक्टोंबर रोजी मुंबई कांदिवली पश्चिम येथील श्री सिद्धिविनायक सहकारी गृहनिर्माण संस्था चे कार्यालय मध्ये या संस्थेचे विद्यमान महासचिव भारत कवितके यांचा वाढदिवस संस्थेचे पदाधिकारी सभासद सदस्य व रहिवासी बांधव यांनी मोठ्या उत्साहात जल्लोषात साजरा केला.जून 2024 मध्ये दिशा शक्ती मिडिया समुहाचा विद्यमान महासचिव भारत कवितके यांना सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल समाज भूषण पुरस्कार जाहीर करण्यात आला होता. तसे दिशा शक्ती मिडिया समुहाचे कार्यकारी संपादक आयोजक रमेश खेमनर यांनी जाहीर केले होते.भारत कवितके यांना सदर



पुरस्कार मुंबई कांदिवली पश्चिम या ठिकाणी दिला.व दिशा शक्ती मिडिया समुहाचे अड वैभव गरगडे यांनी भारत कवितके यांना शुभेच्छा दिल्या.या वेळी श्री सिद्धिविनायक सहकारी गृहनिर्माण संस्था चे मुख्य प्रवर्तक विजय पाल यांनी भारत कवितके यांना शुभेच्छा दिल्या.व भारत कवितके यांच्या विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीचे कौतुक केले.या प्रसंगी अड वैभव गरगडे, विजय पाल,यांचे भारत कवितके यांनी आभार मानले. यावेळी एस.आर.ए.विकासकांचे व्यवस्थापक रियाज सर, कुमार सुगावे, गोपाळ घाग, दशरथ गरगडे, प्रेम शंकर सागर वर्मा,दिवान सिंह,अमोद पाल, प्रभात पाल, संजय कुंभार, उदयराज ऊ, अच्छेलाल यादव,जयंत पाल, आनंदा आमटे, प्रेम भाई, संजय सूर्यवंशी, आफताब अन्सारी, बालाजी सूर्यवंशी व इतर संस्थेचे पदाधिकारी सभासद सदस्य व रहिवासी बांधव मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

## पाटोद्याचे रामकृष्ण बांगर, सत्यभामा बांगरसह ४१ जनाविरुद्ध १३ कोटी पेक्षा जास्त रकमेच्या अपहारप्रकरणी

### बीडचे जिल्हा विशेष लेखापरीक्षक भोसले यांनी केली तक्रार दाखल.

पाटोदा/प्रतिनिधी -बीडचे जिल्हा निबंधक यांच्या आदेशानुसार जिल्हा विशेष लेखापरीक्षक भोसले यांनी पाटोदा येथील महात्मा फुले अर्बन कॉ ऑप बँक लि. चे तीन वर्षाचे लेखापरीक्षण केले असता कागदपत्र न घेता विविध संस्थांना वाटप केलेल्या 13 कोटी 21 लाख 60 हजार 25 रुपये एवढ्या रकमेचा अपहार व गैरव्यवहार झाल्याचा अहवाल जिल्हा निबंधकांना दिल्यानंतर जिल्हा निबंधकाच्या निर्देशानुसार लेखापरीक्षक भोसले यांनी पाटोदा पोलीस ठाण्यात या अपहार प्रकरणी रीतसर तक्रार दाखल केल्यानंतर तब्बल 41 आरोपीविरुद्ध पाटोदा पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे वरील गुन्ह्यातील आरोपीमध्ये संदीप सानप, बाळू पवार ,भाऊसाहेब सोनसळे, तुकाराम बावणे, भगवान शिंदे, श्रीरंग सानप, श्रावण बांगर, संजय सगळे, संभाजी मस्कर, भगवान पाखरे, भगवान सोनवणे राजेंद्र गवळी, नवनाथ नागरगोजे पांडुरंग मस्के, रुक्मिणी बांगर, रफिक पठाण, सीताबाई जावळे रामकृष्ण मारुती बांगर बाळासाहेब राख, रणजीत चौरे, सुरेश पुराणिक, प्रदीप दत्तात्रय कुलकर्णी, भीमराव सानप, दिनकर बांगर, शामराव कंठाळे (मयत ),विष्णू थोरवे, महादेव बांगर, राजाभाऊ बावणे, बाळासाहेब बांगर ,लक्ष्मण शिंदे नवनाथ नागरगोजे , बाबासाहेब नागरगोजे, हनुमंत भोसले, प्रभाकर गीते ,प्रदीप गिरे ,रवींद्र उगले, जनार्धन कंठाळे, गुलान भाई मेंगडे ,रामचंद्र रांजवण, संजय सानप, सत्यभामा रामकृष्ण बांगर आदींचा समावेश आहे तक्रारीमध्ये ज्या 14 संस्थाचा जिल्हा विशेष लेखापरीक्षकांनी उल्लेख केला आहे त्यात प्रगती जिनिंग चुंबळी, चंद्रभागा दूध संस्था, ज्योतिर्लिंग दूध संस्था ,सिताराम बाबा दूध संस्था, सुशिक्षित बेकार दूध संस्था ,महात्मा फुले दूध संस्था ,नवनाथ दूध संस्था, श्रीकृष्ण दूध संस्था, जय किसान दूध संस्था ,जागृती दूध संस्था, सावित्रीबाई फुले दूध संस्था, भगवान बाबा ट्रेडर्स ,पाटोदा तालुका दूध सहकारी संघ आदी संस्थांचा यात समावेश असल्याचे लेखा परीक्षकांनी आपल्या फिर्यादीत म्हटले आहे वरील रकमेच्या अपहरप्रकरणी पाटोदा पोलिसांनी एकूण 41 आरोपी विरुद्ध कलम 420, 406, 409 ,467 ,468 ,471, 34 प्रमाणे गुन्हा दाखल झाला आहे

## टाटायनः; रतन टाटांच्या त्याएका विचाराने मरगळलेल्या टाटा उद्योगाला नवी उभारी

रतन टाटा... ज्यांचं नाव घेतल्याशिवाय भारताचं उद्योग वर्तुळ पूर्ण होऊ शकत नाही. नसरवानजी टाटा यांनी उभारलेल्या, जमशेदजी टाटा यांनी वाढवलेल्या टाटा उद्योग समुहाना विस्तारण्यात रतन टाटा यांचा मोठा वाटा राहिला आहे. आज एकही अशी वस्तू नाही जी टाटा ग्रुप तयार करत नाही. पिढ्यान् पिढ्याच्या व्यवसायाला रतन टाटा यांनी नवी उभारी दिली ती जे. आर. डी. यांच्या विचाराने आणि आधुनिकतेच्या वाटेने... रतन टाटा जेव्हा टाटा उद्योग समुहात आले तेव्हा त्यांच्या एका विचाराने मरगळलेल्या व्यवसायाला त्यांनी नवी उभारी दिली.


रतन टाटांची एन्ट्री

टाटा समुहाचा 'नेल्को' अंतर्गत हा रेडिओची निर्मिती करत होता. एकेकाळी नेल्कोचं मार्केट शेअर 20 % होतं. जे 2 टक्क्यांवर येऊन ठेपलं. टाटा समुहामध्ये मरगळ निर्माण झाली होती. अशावेळी जमशेदजी टाटा यांच्या नातवाला 'नेल्को'ला पुन्हा रूळावर आणण्यासाठी बोलावण्यात आलं. जमशेदजी टाटा यांचा हा नातू म्हणजेच रतन टाटा... तसं तर 1962 पासूनच रतन टाटा हे फॅमिली बिझनेसवर काम करू लागले. पण 1071 ला अधिकृतरित्या रतन टाटा यांना काम करायला सुरुवात केली अन् सुरु झाला प्रवास 'टाटायन'चा...

'त्या' एका विचाराने टाटा उद्योगाला नवी उभारी

1971 टाटा ग्रुपमध्ये ॲक्टिव्ह होताच रतन टाटा यांनी मोठा निर्णय घेतला. रेडिओ बनवणं थांबवूयात. कारण जर 'नेल्को'ला नव्याने उभं करायचं असेल तर आपल्याला नवा विचार आणावा लागेल. आपण सॅटलाईट कम्युनिकेशनवर काम सुरु करूयात, असं रतन टाटांनी सुचवलं. तसं काम सुरु झालं आणि 1975 ला पुन्हा एकदा 'नेल्को' चा मार्केट शेअर 20 टक्क्यांवर आला.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
गुरुवार १० ऑक्टोबर २०२४ पान क्रं - ४ PAGE NO 4




# केंद्राकडे त्याफ १५ जातींसोबत मराठ्यांची जात ओबीसी साठी का पाठवली नाही? जरांगे पाटलांचा सवाल

**राज्य सरकारकडून इतर मागासवर्ग ओबीसींच्या यादीत नव्या जाती समाविष्ट करण्याची शिफारस केंद्र सरकारकडे करण्यात आली आहे. पण या १५ जातींच्या यादीत मराठा समाजाचा समावेश नाही. त्यामुळे मनोज जरांगे यांनी सरकारला सवाल केला आहे.**

महाराष्ट्र सरकारकडून 15 जातींना ओबीसी कोट्यात समाविष्ट करण्यात यावं, अशी शिफारस केंद्र सरकारकडे करण्यात आलं आली आहे. केंद्रीय मागासवर्ग आयोगाकडून जातींची यादी केंद्र सरकारकडे सुपूर्द करण्यात आली आहे. यामध्ये 15 जातींमध्ये बडगुजर, सूर्यवंशी गुजर, लेवे गुजर, रेवे गुजर, रेवा गुजर, पोवार, भोयार, पवार, कपेवार, मुन्नार कपेवार, मुन्नार कापू, तेलंगा, तेलंगी, पेंतारेड्डी, रुकेकरी, लोध लोधा लोधी, डांगरी यांचा समावेश आहे. पण या जातींमध्ये मराठा समाजाचा समावेश करण्यात आलेला नाही. त्यामुळे मनोज जरांगे पाटील यांनी सरकारला सवाल केला आहे. मराठ्यांची जात का नाही पाठवली? असा सवाल मनोज जरांगे यांनी केला. तसेच




मराठ्यांशी दगा फटका करू नये, असादेखील इशारा जरांगे यांनी दिला. मराठा नेते मनोज जरांगे पाटील यांचा बीडमधील श्री क्षेत्र नारायण गड येथे दसरा मेळावा पार पडणार आहे. या दसरा मेळाव्याला मनोज जरांगे हेलिकॉप्टरने येणार अशी चर्चा होती. याबाबत मनोज जरांगे यांना प्रश्न विचारण्यात आला. "सांस्कृतिक कार्यक्रम आहे. त्यामुळे परवानगीचा काही विषय येणारच नव्हता. मेळाव्याला हेलिकॉप्टरने एन्ट्री करावी, अशी समाजाची मागणी आहे. समाज बांधवांच्या भावना होत्या, समाज बांधवांची हजारोंच्या संख्येने गडावर म्हणत होते, हेलिकॉप्टरने जायचं. मात्र आपण गरिबांचा लढा लढतो. आपले बांधव त्यात बसून अधिकारी होऊन आले पाहिजे. समाज मोठा करण्याच माझं स्वप्न आहे. मी भूषाणात जगणारा नाही. मोठेपणात वागणारा नाही. समाजाचं म्हणणं होतं की, गडावर गर्दी होणार आहे. गर्दीतून तुम्हाला येता येणार नाही. एकही हेलिकॉप्टर नको. ते मी रद्द केलं आहे", असं मनोज जरांगे यांनी स्पष्ट केलं.

## दसरा मेळाव्याला परवानगी, जरांगे काय म्हणाले?

मनोज जरांगे यांच्या दसरा मेळाव्याला अखेर परवानगी मिळाली आहे. पण यासाठी पोलिसांनी अनेक अटी ठेवल्या आहेत. याबाबत मनोज जरांगे यांना प्रश्न विचारण्यात आला. त्यावर त्यांनी भूमिका मांडली. "ऐकायला मिळालं होतं की नाही म्हणून, पण एसपी साहेब आणि कलेक्टर साहेब चांगले आहेत. परवानगी तर मिळणारच होती, गोरगरिबांचा दसरा मेळावा आहे. मराठा बांधवांना विनंती आहे की, सगळ्यांनी शांतता राखायची आणि शांततेत जायचं आहे", असं आवाहन मनोज जरांगे यांनी केलं. "लोकांचा आकडा सांगता येणार नाही. पण 10 आले काय आणि 1000 आले काय, आणि लाख आले काय, तरी कार्यक्रम होणार आहे. मात्र लोक घरी थांबत नाही. बीड जिल्ह्यातील एकही माणूस घरी थांबणार नाही", असं मनोज जरांगे म्हणाले. दरम्यान, मनोज जरांगे पाटील यांच्या दसरा मेळाव्याकडे सर्वांचं लक्ष आहे. मनोज जरांगे या मेळाव्यात काही नवी घोषणा करतात का? ते पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.

# सोसायटी अचिव्हर्सफइंग्रजी मॅग्झिनमध्ये आ.पंकजाताई मुंडे झळकल्या!

मुंबई दि. ०८ ----- भाजपच्या राष्ट्रीय सचिव तथा महाराष्ट्रातील धडाडीच्या नेत्या आ. पंकजाताई मुंडे यांची एक विशेष मुलाखत 'सोसायटी अचिव्हर्स' या मुंबईतून प्रकाशित होणा-या सुप्रसिद्ध इंग्रजी मॅग्झिनने घेतली असून स्पेशल एडिशनमध्ये त्यांच्या राजकीय कार्याचा गौरव केला आहे. मॅगझिनने राज्यातील व देशातील विविध क्षेत्रात उत्तुंग यश व नावलौकिक प्राप्त केलेल्या महिलांच्या



मुलाखती या अंकात घेतल्या असून त्या रांगेत आ. पंकजाताईंची देखील मुलाखत घेतली आहे.

'सोसायटी अचिव्हर्स' मॅग्झिनची एक स्पेशल एडिशन या महिन्यात प्रसिद्ध झाली आहे. या इंग्रजी मासिकाचा देश विदेशात मोठा वाचक वर्ग आहे. आ. पंकजाताई मुंडे यांनी आपल्या धडाकेबाज कामातून राज्याच्या राजकारणात एक वेगळी ओळख निर्माण केली आहे शिवाय काम करण्याची त्यांची एक स्वतःची खास शैली आहे, अतिशय अभ्यासू व तळमळीने काम करणा-या नेत्या म्हणून त्या ओळखल्या जातात. त्यांनी नुकतीच काढलेली शिवशक्ती परिक्रमा राज्यभर गाजली. एक लोकनेत्या म्हणून त्यांच्या राजकीय कार्याचा आढावा या मुलाखतीत घेण्यात आला आहे. मॅग्झिनच्या संपादिका अॅन्ड्रेया कोस्टबीर यांनी त्यांची विशेष मुलाखत घेतली असून शिवशक्ती परिक्रमेतील काही फोटो देखील यात घेतले आहेत. प्रसिध्द उद्योजिका नीता अंबानी, डॉ. नीरजा बिर्ला, हेमामालिनी, सुधा मूर्ती, अमृता फडणवीस, प्रियंका चोप्रा, दीपिका पदुकोण, इशा अंबानीसह विविध क्षेत्रातील नामवंत महिलांच्या मॅगझिनमध्ये मुलाखती आहेत. यशस्वीतांच्या स्टोरीचा भाग झाल्याचा आनंद मॅगझिनच्या संपादिका अॅन्ड्रेया कोस्टबीर, अशोक धामणकर यांनी सोमवारी आ. पंकजाताई मुंडे यांची त्यांच्या वरळी येथील कार्यालयात भेट घेऊन या स्पेशल एडिशनचे प्रकाशन केले. सोसायटी मॅगझिन ने 'सोसायटी अचीव्हर्स वुमन लिडर्स' असं एक स्पेशल एडिशन तयार केले आहे.

## नांदेड-पनवेल गाडीच्या बोगींची संख्या वाढवून परळी मार्गे ईतर ठिकाणी रेल्वे सुरु करण्याची डीआरएम यांच्याकडे मागणी- जी.एस.सौंदळे



परळी वैजनाथ/प्रतिनिधी द्वादश पंचम ज्योतीर्लिंग श्री.वैद्यनाथ क्षेत्र परळी मार्गे पुणे-पनवेल जाणा-या नांदेड एक्सप्रेस रेल्वे गाडीच्या प्रवाशी व स्लीपर तसेच ए.सी.बोगींची संख्या तात्काळ वाढवून या रेल्वेने दाटीवाटीने प्रवास करणा-या प्रवाशांची गैरसोय तात्काळ दुर करून परळी मार्गे पुणे,मुंबई,नागपुर,तिरूपती,अयोध्या, वाराणसी,गोवा व ईतर ठिकाणी रेल्वे सुरू करण्याची मागणी दक्षिण मध्य रेल्वेचे विभागिय व्यवस्थापक श्री.भरतेशकुमार जैन परळी रेल्वे स्थानक येथे तपासणीनिमित्त बुधवार दि.9 ऑक्टोंबर रोजी आले असताना रेल्वे प्रवाशी संघटनेचे अध्यक्ष जी.एस.सौंदळे यांच्यासह विविध राजकीय पक्षांच्या पदाधिकारी व महाराष्ट्र प्रदेश प्रवासी महासंघ बीड जिल्हा व प्रवाशांच्यावतीने करण्यात आली.

नांदेड-पनवेल रेल्वेगाडी च्या बोगी वाढवण्याच्या मागणीसह प्रवासी जनतेच्या व्यापक हिताच्या दृष्टीने काही महत्वपूर्ण मागण्या निवेदनात करण्यात आल्या यामध्ये 1)मछलीपट्टणम -बीदर, सिकंद्राबाद-बीदर इंटरसिटी,यशवंतपुर-बीदर एक्सप्रेस,पाटणा-पूर्णा,रायचूर-परभणी रेल्वे परळी-वैजनाथ पर्यंत त्वरीत विस्तारीत करावी. 2)दिवाळी सणानिमित्त परळी-वैजनाथ मार्गे सिकंदराबाद- छ.संभाजीनगर-मुंबई तसेच पुणे व ईतर ठिकाणी विशेष रेल्वे सुरू करावी. 3) 'पूर्णा-परळी' रेल्वे परत जाताना बहुअंशी रिकामीच असते त्या ऐवजी ती लातूर- धाराशिव किंवा उदगीर-बीदर पर्यंत विस्तारित करावी. 4)अमरावती -पुणे व कोल्हापुर नागपुर रेल्वे दररोज चालू कराव्यात 5)क्रॉसिंगच्या निमित्ताने घाटनांदूर,वडगाव (निळा) इत्यादी स्टेशन वर विविध गाड्या विनाकारण अधिक वेळ खोळंबून ठेवू नयेत,परळी रेल्वे स्थानकातील आरक्षण वेळ वाढवावी यासह ईतर मागण्या करण्यात आल्या यावेळी नगरसेवक चेतन सौंदळे,प्रवासी महासंघ बीड जिल्हा संघटक सुधीर फुलारी सर,विजयाताई दहीवाळ,सत्यनारायण दुबे,माजी नगरसेवक सोमनाथ निलंगे,मकरंद नरवणे,कैलास तांदळे,राजेश कांकरिया,दै.लोकमत चे तालुका प्रतिनिधी पत्रकार संजय खाकरे,रमणीक पटेल,चंदूअण्णा हालगे,शिरीष सलगरे,हिरालाल बोरा,अनिल मिसाळ,आदिंची उपस्थिती होती.परळी मार्गे विविध ठिकाणी रेल्वे सुरू करणे तसेच पिट लाईन यंत्रणा व रेल्वे स्थानकात अद्यावत सुविधा निर्माण करण्याचे काम रेल्वे विभागामार्फत करण्याचे सकारात्मक आश्वासन शिष्टमंडळास डीआरएम श्री.जैन यांनी दिले.

# श्री सिद्धेश्वर महाविद्यालयात ईव्हीएम मशीन हाताळणी प्रशिक्षण शिबिर संपन्न

येथील श्री सिद्धेश्वर महाविद्यालयांमध्ये ईव्हीएम हाताळणी प्रशिक्षण शिबीर संपन्न झाले. भारत हा लोकशाही प्रधान देश आहे. लोकशाहीच्या या उत्सवामध्ये लोकसभा व विधानसभा निवडणूकांना खूप महत्त्व आहे. महाराष्ट्रात होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नवं मतदारांची जनजागृती व्हावी व त्यांच्यावरील ईव्हीएम मशीन हाताळण्याचे दडपण दूर व्हावे या उद्देशाने या अभियानाचे आयोजन करण्यात आले होते. ईव्हीएम हाताळणी संदर्भाची संपूर्ण माहिती श्रीपटवी यांनी विद्यार्थ्यांना दिली तसेच यावेळेस विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष मतदान करण्याचा अनुभव घेतला. या कार्यक्रमात एनएसएसचे सर्व स्वयंसेवक उपस्थित होते



# श्रीक्षेत्र माहूरगड येथे श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाच्या माध्यमातून गेल्या चार वर्षापासून भारतभरातून येणा-या लाखो भाविक भक्तांना अन्नदान...!






पुणे दि. 05 (प्रतिनिधी)-
श्रीक्षेत्र माहूर - अत्रिनंदन मोरे
• निस्वार्थपणे लाखो भक्तांसाठी अन्नदानाची व्यवस्था करणाऱ्या श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाला अजूनही माहूर नगरपंचायत मार्फत पाण्याची व्यवस्था नाही.
• स्थानिक प्रशासन किंवा लोकप्रतिनिधींनी याकडे अद्यापही लक्ष दिले नाही.

श्रीक्षेत्र माहूर येथे गेल्या चार वर्षापासून श्री स्वामी समर्थ अन्नछत्राच्या माध्यमातून माहूरगड येथे येणाऱ्या लाखो भाविक भक्तांना दररोज अन्नदान हे मोफत दिल्या जाते. अन्नदान हे सर्वश्रेष्ठ दान मानल्या जाते.नांदेड व इतरत्र असलेल्या श्री स्वामी समर्थ यांच्या भक्तांकडून माहूरगड येथे अन्नछत्राची व्यवस्था करण्यात आलेली आहे. गेल्या चार वर्षापासून दिवस-रात्र अविरत सेवा अन्नछत्रांच्या माध्यमातून भाविक भक्तांना होते.कोरोना सारख्या महामारीच्या काळात सुद्धा भाविकांना अन्नदान करण्याचे काम या अन्नछत्राच्या माध्यमातून झालेले आहे.

श्री स्वामी समर्थ अन्नछत्राच्या माध्यमातून दररोज हजारो भाविक भक्त तिथे जेवणासाठी येत असतात. नांदेड सारख्या जिल्ह्याच्या ठिकाणावरून माहूरगड येथे एक अन्नदानाची व्यवस्था करण्याचे काम नांदेड येथील श्री स्वामी समर्थांच्या भक्तांकडून केल्या जाते. दिवस-रात्र अविरत अन्नदानांच्या माध्यमातून सेवा देत असताना माहूर सारख्या ठिकाणाहून नगरपंचायतच्या मार्फत साधी पाण्याची सुद्धा व्यवस्था झालेली नाही,तेवढेच काय तर अन्नछत्रावरील कचरा उचलण्यासाठी साधी घंटागाडी सुद्धा तिथे येत नाही.अन्नछत्रावरील सदस्यांच्या माध्यमातून वारंवार नगरपंचायत येथील मुख्याधिकारी तहसील येथील तहसीलदार, सहायक जिल्हाधिकारी किनवट, जिल्हाधिकारी नांदेड, किनवट माहूर मतदार संघाचे आजी-माजी आमदार, नांदेड व हिंगोलीचे खासदार, बरेच असे मंत्री महोदय व स्वतः नितीनजी गडकरी साहेब यांना अन्नछत्रावरील शिष्टमंडळ यांनी भेट घेऊन सुद्धा अद्यापही त्यांना पाण्याची व्यवस्था करून देण्यात आलेली नाही.

मोठमोठ्या विकासाचा बोलबाला करणाऱ्या माहूर नगरपंचायत मार्फत श्री स्वामी समर्थ अन्नछत्रामध्ये साध्या पाण्याची व्यवस्था सुद्धा करून देण्यात आलेली नाही.एवढ्या सगळ्या कठीण प्रसंगातून सुद्धा निस्वार्थपणे अन्नदान करणाऱ्यांना श्री स्वामी समर्थ यांचा आशीर्वाद कायमस्वरूपी त्यांच्या पाठीशी राहील.भविष्यात श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचा पाण्याचा प्रश्न सुटेल कि नाही याकडे सर्वांचे लक्ष.

१
अन्नछत्रासाठी पाण्याची सुविधा करून द्यावे यासाठी वारंवार नगरपंचायत,तहसीलदार,सहाय्यक जिल्हाधिकारी,जिल्हाधिकारी तसेच आमदार,खासदार व केंद्रीय मंत्री माननीय ना.श्री नितीनजी गडकरी साहेब यांना कळून सुद्धा कुठल्याही प्रकारचे प्रतिसाद नाही.श्री स्वामी समर्थ अन्नछत्राच्या माध्यमातून अन्नदान करणाऱ्या सेवकांना दररोज टँकरच्या माध्यमातून पाणी विकत घ्यावे लागते.

२
नवरात्र उत्सवाच्या काळात भाजीपाला व अन्नधान्य नेत असलेल्या वाहनांना पास देण्यास टाळाटाळ करण्यात आले.नगरपंचायत मार्फत साधी घंटागाडी येऊन अन्नछत्रावरील कचरा सुद्धा उचलल्या जात नाही.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com